MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@mercindia.org.in / mercindia@merc.gov.in
संकेतस्थळ : www.mercindia.org.in / www.merc.gov.in

**जाहिरात क्र. ११/२०१३-१४**

## जाहीर सूचना

**सन २०१३ चे प्रकरण क्र. ५२**

**विद्युत अधिनियम २००३ (विअ २००३) च्या कलम १५ च्या उप-कलम (५)च्या खंड (ए) अंतर्गत सूचना**

१. मे. डी. एम. कॉर्पोरेशन प्रा. लि. मोहिते हाऊस, २४०/बी, जनरल थोरात मार्ग, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३, महाराष्ट्र, यांनी संपूर्ण महाराष्ट्रात राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

२. मे. डी. एम. कॉर्पोरेशन प्रा. लि., ने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (२) अंतर्गत दि टाईम्स ऑफ इंडिया, सकाळ टाईम्स, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, तरुण भारत, रत्नागिरी टाईम्स आणि नवभारत टाईम्स या वर्तमानपत्रांमध्ये दिनांक १२ जुलै, २०१३ रोजी एक जाहीर सूचना प्रसिद्ध केली.

३. मे. डी. एम कॉर्पोरेशन प्रा. लि. ने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्या सोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह **www.dminfra.com** या संकेतस्थळावर आणि आयोगाच्या **www.mercindia.org.in / www.merc.gov.in** या संकेतस्थळांवर पाहता येईल किंवा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये घालून देण्यात आलेल्या कार्यपद्धतीस अनुसरुन कोणत्याही व्यक्तीला ती आयोगाच्या कार्यालयामध्ये तपासता येईल.

४. आयोगाकडे उपलब्ध असलेले दस्तावेज विचारात घेतल्यावर, आयोगाचे सकृतदर्शनी असे समाधान झाले आहे की, अर्जदार पहिल्या वर्षी ५० दशलक्ष युनिट्स व पाच वर्षांच्या कालावधीत हळूहळू वाढ करून १०० दशलक्ष युनिट्सचा राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना मंजूर करण्यासाठी पात्र आहे. आयोग, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००६ ने सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ च्या संदर्भात ‘अ’ वर्गवारीतील वीज व्यापारी म्हणून अर्जदाराला महाराष्ट्र राज्यात राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना मंजूर करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

५. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) अंतर्गत या जाहीर सूचनेद्वारे, संपूर्ण महाराष्ट्रात राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना मंजूर करण्याच्या आयोगाच्या प्रस्तावासंबंधी सूचना किंवा हरकती खाली सही करणाऱ्यास **उशिरात उशिरा २४ ऑक्टोबर, २०१३** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने आमंत्रित करण्यात येत आहेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

६. इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या सूचना किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीत, सहा प्रतींमध्ये पाठवाव्यात व त्या पाठविताना पाठविणाऱ्याने त्याचे संपूर्ण नाव व पत्ता आणि असल्यास, ई-मेल आयडी देखील नमूद करावा. तसेच, सूचना किंवा हरकती, या कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे स्पष्ट करण्यात यावे. आयोगाने, यासंबंधी **जाहीर सुनावणी गुरुवार, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ रोजी सकाळी ११.३० वाजता**, १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५ येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्याचे निश्चित केले आहे आणि ज्या व्यक्तीने सूचना किंवा हरकती दाखल केल्या आहेत अशी व्यक्ती इच्छा असल्यास या जाहीर सुनावणीस उपस्थित राहू शकेल, मात्र त्यासाठी आयोगाकडून कोणताही प्रवास भत्ता / दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

**दिनांक : २७ सप्टेंबर, २०१३**
**मुंबई**

**स्वाक्षरी/-**
**सचिव, मविनिआ**